# भि. ग. रोहमारे राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोपरगाव : शहरातील स्थानिक के. जे. सोमैया (वरिष्ठ) व के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण सोमवारी (दि.७) पार पडले. पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कोपरगाव येथील राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक सुभाष महाजन होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. श्रीकांत बेडेकर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. बी. एस. यादव यांनी उपस्थित लेखक व मान्यवरांचे स्वागत केले.

पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. जेभाऊ मोरे यांनी पुरस्कृत लेखक व कवी यांच्या साहित्यकृतींचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रमुख पाहुणे व



कोपरगाव येथे राज्यस्तरीय भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त लेखक प्रवीण बांदेकर (इंडियन ऍनिमल फार्म, ग्रामीण कादंबरी), प्रभाकर शेळके (व्यवस्थेचा बइल, ग्रामीण कथासंग्रह), संदीप जगदाळे (असो आता चाड, ग्रामीण कविता संग्रह), बाळू दुगडुमवार (बाबा आमटे : व्यक्तित्त्व, कवित्व आणि कर्तृत्व, समीक्षा ग्रंथ) यांना प्रत्येकी भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्काराचे सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व ११ हजार रुपये रोख असे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी प्रा. श्रीकांत बेडेकर, सुभाष महाजन, संस्थेचे अध्यक्ष अशोक रोहमारे, सचिव संजीव कुलकर्णी यांच्यासह पुरस्कारप्राप्त कवी व लेखकांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी रमेश रोहमारे, राहुल रोहमारे, संदीप रोहमारे, सुजित रोहमारे, ॲड. संजय भोकरे, चंद्रशेखर कुलकर्णी, सोमनाथ सोनपसारे, प्रा. सुभाष शिंदे उपस्थित होते. यशस्वितेसाठी उपप्राचार्य डॉ. संतोष पगारे, प्रा. विजय ठाणगे, डॉ. एस. बी. दवंगे, कार्यालयीन अधीक्षक डॉ. अभिजीत नाईकवाडे आदी प्राध्यापकवृंद व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. शैलेंद्र बनसोडे, प्रा. मधुमिता निळेकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

दैनिक दिव्य मराठी
. समाज . संस्था
दिव्य मराठी, गुरुवार, १० डिसेंबर २०२०
divyamarathi.com
दिव्य मराठी अहमदनगर, गुरुवार, १० डिसेंबर २०२०

### सन्मान • पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रा. श्रीकांत बेडेकर यांचे प्रतिपादन

# साहित्यातून मानवी मनावर संस्कार केले जातात, त्यातूनच मने जुळतात

प्रतिनिधी | कोपरगाव

जगावं कसं हे शिकावं, अनुभवावं जगतं. मी प्रत्यक्ष जीवन जगत आलो. माझ्या दृष्टीने मानवी जीवन हेच एक मोठे काव्य आहे. कारण काव्य आणि एकूणच साहित्यात अनुभवाचे महत्त्व सर्वाधिक आहे. साहित्यातून मानवी मनावर संस्कार केले जातात, त्यातूनच मने जुळतात', असे प्रतिपादन नगर येथील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. श्रीकांत बेडेकर यांनी केले.

के. जे. सोमैया (वरिष्ठ) व के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालयात आयोजित के. बी. रोहमारे पुण्यस्मरण व राज्यस्तरीय भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक सुभाष महाजन होते. प्रा. बेडेकर म्हणाले, रोहमारे पुरस्कारांची ३२ वर्षांची परंपरा म्हणजे मराठी ग्रामीण साहित्याचा सोनेरी इतिहास आहे. ज्या साहित्यिकांना हा पुरस्कार दिला जातोय, ते उद्या आघाडीचे ग्रामीण साहित्यिक ठरतील.

अध्यक्षस्थानावरून महाजन म्हणाले, ललित साहित्याशी माझा संबंध खूप कमी आला, परंतु आज या कार्यक्रमातून मलाही ललित साहित्याचा (कवितेचा) डंख झाला. अशोक रोहमारे म्हणाले, दोन वर्षांपूर्वी आमच्या मातु:श्रींचे निधन झाले. निधनापूर्वी त्यांनी आपली सर्व पुंजी ट्रस्टमध्ये जमा केल्यामुळे पुरस्काराची रक्कम ११ हजार करता आली. पुढील वर्षापासून ही रक्कम १५ हजार करण्यात येईल. संस्थेचे सचिव संजीव कुलकर्णी म्हणाले, शहरी साहित्यापेक्षा ग्रामीण साहित्य अधिक वास्तव व मार्मिक असते. त्यामुळेच मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याची प्रदीर्घ परंपरा तयार होऊन अनेक दिग्गज साहित्यिक तयार झाले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. बी. एस. यादव यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा व पुरस्कार योजनेचा आढावा घेतला. पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. जिजाभाऊ मोरे यांनी साहित्यकृतींचा परिचय दिला. त्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. शैलेंद्र बनसोडे व प्रा. मधुमिता निळेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्यस्तरीय भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे वितरण



के. जे. सोमैया व के. बी. रोहमारे महाविद्यालयात आयोजित के. बी. रोहमारे पुण्यस्मरण व राज्यस्तरीय भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण प्रवीण बांदेकर, प्रभाकर शेळके, संदीप जगदाळे, बाळू दुगडूमवार यांना करण्यात आले.

### भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे मानकरी

प्रवीण बांदेकर (इंडियन ऑनिमल फार्म, ग्रामीण कादंबरी), प्रभाकर शेळके (व्यवस्थेचा बइल, ग्रामीण कथासंग्रह), संदीप जगदाळे (असो आता चाड, ग्रामीण कवितासंग्रह), बाळू दुगडूमवार (बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व, ग्रामीण समीक्षा ग्रंथ) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# मा.आ.कैं. के.बी. रोहमारे पुण्यस्मरण व भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभ : दि. ७ डिसें., २०२०




के.बी.साहेब पुण्यस्मरण व भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात के.बी. साहेबांच्या आठवणी सांगतांना प्रमुख अतिथी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा.श्रीकांत बेडेकर, समवेत मा.अशोकराव रोहमारे, मा.सुभाष महाजन (माजी पोलीस उपअधीक्षक), मा.ॲड्. संजीवदादा कुलकर्णी व मा. प्राचार्य




समारंभात पारितोषिक प्राप्त ग्रामीण साहित्यिकांचे अभिनंदन करतांना संस्थेचे व ट्रस्टचे अध्यक्ष मा. अशोकराव रोहमारे, समवेत इतर मान्यवर



भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा.बाळू दुगडूमवार, मा. संदीप जगदाळे व डॉ.प्रभाकर शेळके मान्यवरांसमवेत




संस्थेचे सचिव मा.ॲड्.संजीवदादा कुलकर्णी आपले मनोगत व्यक्त करतांना, समवेत इतर मान्यवर




कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.सुभाष महाजन अध्यक्षीय भाषण करताना, समवेत इतर मान्यवर



उत्कृष्ट ग्रामीण कादंबरीसाठी पुरस्कार प्राप्त साहित्यिक प्रा. प्रविण बांदेकर आपले मनोगत व्यक्त करताना, समवेत इतर मान्यवर

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे

**के.जे.सोमैया (वरिष्ठ) व के.बी. रोहमारे (कनिष्ठ)**

**महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगांव**



# ।। कै. के. बी. रोहमारे पुण्यस्मरण ।।

स.न.वि.वि. आमच्या संस्थेचे संस्थापक व माजी आमदार

**कै. के. बी. रोहमारे यांचा स्मृतिदिन**

मंगळवार, दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी आहे. त्यानिमित्ताने

**संतोष जगताप, माधव जाधव, जयराम खेडेकर,**

**केदार काळवणे, अनंता सूर यांना**

## भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार

**मा.डॉ. सदानंद देशमुख**

(साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व चित्रपट पटकथाकार)

यांच्या शुभहस्ते व

**मा. पद्मकांतजी कुदळे**

(माजी नगराध्यक्ष, कोपरगाव नगरपरिषद)

यांच्या अध्यक्षतेखाली

सन्मानपूर्वक वितरीत केले जाणार आहेत.

तरी या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

❖ *आपले स्नेहांकीत* ❖

| अॅड. संजीव कुलकर्णी | रामदास पा. होन | अशोकराव रोहमारे |
|---|---|---|
| सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

तथा सर्व कार्यकारिणी सदस्य, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी

| डॉ. गणेश देशमुख | डॉ. बी. एस. यादव |
|---|---|
| कार्यवाह, पुरस्कार योजना | प्राचार्य |

❖ *स्थळ व वेळ* ❖

**के.जे.सोमैया महाविद्यालय, साकरबेन सभागृह**, मोहनीराजनगर, कोपरगाव

*मंगळवार दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० वा.*

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# के. जे. सोमैया (वरिष्ठ) व के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालय,

मोहनीराजनगर, कोपरगाव, जि. अहमदनगर



## || कार्यक्रम - पत्रिका ||

मंगळवार, दि. ७ डिसेंबर, २०२१

सकाळी १०-०० वा.



## || के. के. बी. रोहमारे पुण्यस्मरण ||

- ❖ प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन : शुभहस्ते - मा. प्रमुख पाहुणे
- ❖ प्रास्ताविक : प्राचार्य डॉ. बी. एस. यादव
- ❖ पाहुण्यांचा परिचय : प्रा.डॉ. जिभाऊ मोरे
- ❖ स्वागत व सत्कार : मा. प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, पत्रकार तथा परीक्षक
  शुभहस्ते- मा. अशोकराव रोहमारे
  तथा संस्थेचे अन्य पदाधिकारी
- ❖ संस्था सचिवांचे मनोगत : मा. ॲड्. संजीव कुलकर्णी
  (सचिव, को. ता. एज्यु. सोसा. कोपरगाव)
- ❖ संस्थाध्यक्षांचे मनोगत : मा. अशोकराव रोहमारे
  (अध्यक्ष, को. ता. एज्यु. सोसा. कोपरगाव व रोहमारे ट्रस्ट)

## || मि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण ||

- ❖ कार्यवाह व परीक्षकांचे निवेदन : प्रा. डॉ. गणेश देशमुख
- ❖ साहित्य पुरस्कार वितरण : शुभहस्ते- मा. प्रा. डॉ. सदानंद देशमुख
  (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व चित्रपट पटकथाकार )
- ❖ पुरस्कार प्राप्त लेखकांचे मनोगत : मान्यवर लेखक
- ❖ प्रमुख पाहुण्यांचे भाषण : मा. प्रा. डॉ. सदानंद देशमुख
- ❖ अध्यक्षीय समारोप : मा. पद्मकांतजी कुदळे
  (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व कोपरगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष)
- ❖ आभार आणि सूत्र संचालन : प्रा. डॉ. शैलेंद्र बनसोडे
  प्रा. डॉ. जिभाऊ मोरे

प्राचार्य
के. जे. सोमय्या कॉलेज
कोपरगांव

प्राचार्य
के. जे. सोमैया कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, कोपरगांव



माजी आमदार
कै. के. बी. रोहमारे

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

*मोहनीराजनगर, कोपरगाव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र) पिन -४२३६०१*

फोन नं. 9146142000, 9146152000. ईमेल आयडी.- kjscollege@rediffmail.com / admin@kjscollege.com



पद्मभूषण
कै. के. जे. सोमैया

'स्थापना -१९६४' 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित' 'आयडी नं. पुणे/एएन/एएससी/०७/(१९६४)'

प्राचार्य — डॉ. बी. एस. यादव (एम.एस्सी., पीएच.डी.) संस्थापक अध्यक्ष — कै. के. बी. रोहमारे (माजी आमदार)


प्रति,

**मा. डॉ. सदानंद देशमुख**
बुलढाणा.

**विषय:- दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी कै. बी रोहमारे पुण्यस्मरण व भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरणास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबाबत.....**

आदरणीय महोदय,

भि.ग. रोहमारे ट्रस्टद्वारे मराठी ग्रामीण साहित्यातील प्रकाशित ग्रंथाना दरवर्षी पुरस्कार दिले जातात, याबद्दलची सविस्तर कल्पना आपणास आहेच. आपणांसही हा सन्मान प्राप्त झाला आहे. त्यानंतर आपणास साहित्यअकादमीचा पुरस्कार व इतर अनेक सन्मान लाभले. आपल्या बारोमास या कादंबरीवर व अनेक कथांवर चित्रपट निघाले, त्यामुळे मराठीतील ग्रामीण साहित्य व चळवळीला आपल्या लेखन - कर्तृत्वाने भरभक्कम आधार प्राप्त करुन दिला आहे. त्याचमुळे यावर्षीच्या पुरस्कारांचे वितरण आपल्या शुभ हस्ते झाल्यास नवोदित ग्रामीण लेखकांना अधिक प्रेरक ठरेल असे आम्हाला वाटते.

आपल्या मागील कामं ाची कल्पना आम्हाला आहेच, तरीही आम्ही ज्या निष्ठेने हे कार्य करीत आहोत त्यासाठी व ग्रामीण साहित्यावरील आपली निष्ठा व प्रेम, याकरीता आपण आमचे हे निमंत्रण स्वीकारुन **मंगळवार दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी संपन्न होणाऱ्या पुरस्कार वितरण** सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहावे, ही आग्रहाची विनंती !

या कार्यक्रमाचे अध्यक्ष **कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे हे** असणार आहेत. बाकी ठीक. आम्ही आपल्या स्वागतास उत्सुक आहोत ....

कळाव.ं,

आपले स्नेहाकित,

**(डॉ. गणेश देशमुख )**
**कार्यवाह,**
**भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार**

**(डॉ. बी.एस.यादव)**

प्राचार्य
के. जे. सोमैया कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, कोपरगांव

कोपरगांव तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मोहनीराजनगर, कोपरगांव - ४२३६०१, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न : आयडी नं. पी.यु./ए.एन./ए.एस.सी./०७(१९६४)
☎ : 9146152000, 9146142000, Email ID : kjscollege@rediffmail.com, Website : kjscollege.com

NAAC ACCREDITED 'A' GRADE | AN ISO 9001-2015 CERTIFIED INSTITUTE
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ "उत्कृष्ठ महाविद्यालय" पुरस्कार प्राप्त

प्राचार्य - डॉ. बी. एस. यादव (एम.एस्सी.,पीएच.डी.) संस्थापक अध्यक्ष - कै. के.बी. रोहमारे (मा.आमदार)

संदर्भ क्रमांक : ३६७९/२०२१-२२ दि. २/११/२०२१

प्रति,
**मा. पद्मकांतजी कुदळे**
माजी नगराध्यक्ष,
कोपरगाव नगरपरिषद,
कोपरगाव.

**विषय:- शनिवार, दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी कै. बी रोहमारे पुण्यस्मरण व भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरणास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याबाबत.....**

आदरणीय महोदय,

भि.ग. रोहमारे ट्रस्टद्वारे मराठी ग्रामीण साहित्यातील प्रकाशित ग्रंथाना दरवर्षी पुरस्कार दिले जातात, याबद्दलची सविस्तर कल्पना आपणास आहेच. येत्या ७ डिसेंबर रोजी आमच्या संस्थेचे संस्थापक व माजी आमदार कै. के. बी. रोहमारे यांचा २३ वा स्मृतिदिन आहे. आपले व के. बी. साहेबांचे अत्यंत घनिष्ठ स्नेह संबंध होते. तसेच आपण कोपरगाव नगरपरिषदेचे अध्यक्ष असतांना अनेक लोकोपयोगी कामे केली असून, आपण सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेले कार्य सर्वश्रृत आहे. त्याचमुळे यावर्षीच्या पुरस्कारांचे वितरण आपल्या अध्यक्षतेखाली झाल्यास नवोदित ग्रामीण लेखकांना अधिक प्रेरक ठरेल असे आम्हाला वाटते.

आपल्या मागील कामांची कल्पना आम्हाला आहेच, तरीही आम्ही ज्या निष्ठेने हे कार्य करीत आहोत त्यासाठी व ग्रामीण साहित्य व के. बी. साहेबांशी असलेली आपली निष्ठा व प्रेम, याकरीता आपण आमचे हे निमंत्रण स्वीकारुन **मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी संपन्न होणाऱ्या पुरस्कार वितरण** सोहळयास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहावे, ही आग्रहाची विनंती !

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिध्द लेखक व साहित्यअकादमी पुरस्कार प्राप्त **प्रा. डॉ. सदानंद देशमुख** हे असणार आहेत. या संदर्भात आमचे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अशोकराव रोहमारे यांनी आपणाशी संपर्क साधला होता. व आपण हे आमचे निमंत्रण स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्हा सर्वांचा उत्साह द्विगुणीत झाला आहे.

आम्ही आपल्या स्वागतास उत्सुक आहोत ....

कळावे,

आपले स्नेहाकित,

(डॉ. गणेश देशमुख )
कार्यवाह,
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार

(डॉ. बी.एस.यादव)
प्राचार्य
के. जे. सोमैया कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, कोपरगांव

**प्रा.डॉ. गणेश देशमुख**
(M.A.,M.Phil,Ph.D NET.)
मराठी विभागप्रमुख
के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर.
फोन - (०२४२३) २२२५४

निवास : यमुना, साईनगर, फादरवाडी, कोपरगांव, जि. अ.नगर ☎ (०२४२३) २२२५१५, भ्रमणध्वनी - ९४२०६३९९५५

दि. 92 / 99 /२०२०

प्रति,
**मा. प्राचार्य डॉ. भिमराव वाकचौरे**
वैजापूर.

**विषय:- भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजनेच्या निवड समितीवर काम करणे बाबत.....**

आदरणीय महोदय,

भि.ग. रोहमारे ट्रस्टद्वारे मराठी ग्रामीण साहित्यातील प्रकाशित ग्रंथांना दरवर्षी पुरस्कार दिले जातात, याबद्दलची सविस्तर कल्पना आपणास आहेच. आपणही मराठी विषयाचे एक अभ्यासू प्राध्यापक व ग्रामीण साहित्याचे अभ्यासक देखील आहात. तसेच आमची संस्था व महाविद्यालयाशी असलेला आपला स्नेह आणखी वृध्दिंगत व्हावा अशी आमची सर्वांची मनापासून इच्छा आहे. त्याचमुळे आपणास थोडी तसदी देत आहोत.

सदर पुरस्कार योजनेसाठी आलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातुन एका उत्कृष्ठ कादंबरीची आपण निवड करावी ही विनंती.

कळाव.`,

आपले स्नेहाकित,

के.जे. सोमैया महाविद्यालय मराठी विभाग कोपरगांव, जि.अहमदनगर

(डॉ. गणेश देशमुख )
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना

सोबत :- या वर्षीच्या (२०२०) ५ कादंबऱ्या.

# २०२०- पुरस्कार प्राप्त लेखक

१. वीजेने चोरलेले दिवस- संतोष जगताप (ग्रामीण कांदबरी - दर्या प्रकाशन ,पुणे)

२. चिन्हांकित यादीतली माणसं- माधव जाधव (ग्रामीण. कथासंग्रह-सायन पब्लिकेशन, पुणे)

३. मोरपीस - प्रा. जयराम खेडेकर (ग्रा. कविता संग्रह-उर्मी प्रकाशन, जालना)

४. ग्रामीण साहित्य: संकल्पना आणि समीक्षा : केदार काळवणे (ग्रा. साहित्य समीक्षा-अक्षरवाउ्.मय प्रकाशन, पुणे)

५. काटेरी पायवाट : अनंता सूर (ग्रा. आत्मकथन - अर्थव पब्लिकेशन, धुळे)

ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व चित्रपट पटकथाकार डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व कोपरगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या व अध्यक्षतेखाली परीक्षक - डॉ. भीमराव वाकचौरे, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, डॉ. गणेश देशमुख, डॉ. जिभाऊ मोरे, डॉ. संजय दवंगे

(पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रु. ११०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र)

प्रा.डॉ.गणेश देशमुख
कार्यवाह
भि.ग.रोहमारे ग्रामीण साहित्य
पुरस्कार योजना

संस्थापक



माजी आमदार के.बी. रोहमारे

रजि.नं.३/१७१/अहमदनगर

# भि.ग. रोहमारे ट्रस्ट

पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. ☎ (०२४२३) २७५२२२

• संस्थापक : माजी आमदार कै. के.बी. रोहमारे • अध्यक्ष : अशोकराव रोहमारे

पत्रव्यवहाराचा पत्ता : भि.ग. रोहमारे ट्रस्ट, द्वारा प्राचार्य, के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर. फोन - (०२४२३) २२२२५४

जावक क्र. :

दि. १५ / ११ /२०२१

प्रति,
**मा. संतोष जगताप**
लोणविरे, ता. सांगोला.

स.न.वि.वि.

**सर्व प्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन !**

इ.स.२०२० चा राज्यपातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार आपल्या **वीजेचे चोरलेले दिवस** या कादंबरीस जाहीर करतांना आम्हाला आनंद होत आहे. पुरस्काराचे स्वरुप रोख रु.११,०००/-, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. पुरस्काराचे वितरण मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ रोजी स.१०.०० वा. के. जे. सोमैया महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव येथे ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. आपणास विनंती की आमच्या हा छोटासा सन्मान स्वीकारण्यासाठी यावे.

आपली व सोबत एका व्यक्तिची निवास-भोजन व्यवस्था करण्यात आली असून आर्थिक मर्यादेमुळे तीव्र इच्छा असूनही आपणास नाममात्र प्रवासभाडे मात्र देण्यात येईल. सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून हा उपक्रम आम्ही राबवित आहोत. कृपया आपण आमच्या भावना समजून घ्याल, ही अपेक्षा !

आपण दि.६ डिसेंबर रोजी अथवा ७ डिसेंबरला सकाळी ९.०० वा. पर्यंत कोपरगावी पोहचावे. महाविद्यालय गावाजवळच आहे. शिर्डी कडून आपण येणार असल्यास बेट नाका येथे उतरावे अन्यथा बस स्थानकावरुन चालत अथवा रिक्षाने येता येते. हे पत्र मिळताच आपण केव्हा येणार हे दूरध्वनीवरुन कळवावे, ही विनंती !

वितरणाची पत्रिका लवकरच पाठविता. वेळ कमी आहे. बाकी दूरध्वनीवर बोलतो.

**आपल्या साहित्यातून यापुढेही ग्रामीण माणसाचे सुख-दु:ख अधिक सशक्तपणे यावे व त्याला अनेक सन्मान लाभावे, यासाठी उदंड शुभेच्छा !**

कळावे,

आपला स्नेहांकित,

के.जे. सोमैया महाविद्यालय कोपरगांव, जि. अहमदनगर मराठी विभाग

(डॉ. गणेश देशमुख)
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना
फोन नं. : निवास : (०२४२३) २९५९५५,
कार्यालय : २२२२५४, भ्रमणध्वनी : ९४२०६३९९५५

संस्थापक



माजी आमदार के.बी. रोहमारे

रजि.नं.३/१७१/अहमदनगर

# भि.ग. रोहमारे ट्रस्ट

पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. ☎ (०२४२३) २७५२२२

• संस्थापक : माजी आमदार कै. के.बी. रोहमारे • अध्यक्ष : अशोकराव रोहमारे

पत्रव्यवहाराचा पत्ता : भि.ग. रोहमारे ट्रस्ट, द्वारा प्राचार्य, के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर. फोन - (०२४२३) २२२२५४

जावक क्र. :

दि. १५/११/२०२१

प्रति,

**मा. माधव जाधव**

कळंब, जि. उस्मानाबाद

स.न.वि.वि.

**सर्व प्रथम आपले मनःपूर्वक अभिनंदन !**

इ.स.२०२० चा राज्यपातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार आपल्या **चिन्हांकित यादीतली: माणसं** या **ग्रामीण कथा संग्रहास** जाहीर करतांना आम्हाला आनंद होत आहे. पुरस्काराचे स्वरुप रोख रु.११,०००/-, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. पुरस्काराचे वितरण मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ रोजी स.१०.०० वा. के. जे. सोमैया महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव येथे ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. आपणास विनंती की आमच्या हा छोटासा सन्मान स्वीकारण्यासाठी यावे.

आपली व सोबत एका व्यक्तिची निवास-भोजन व्यवस्था करण्यात आली असून आर्थिक मर्यादेमुळे तीव्र इच्छा असूनही आपणास नाममात्र प्रवासभाडे मात्र देण्यात येईल. सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून हा उपक्रम आम्ही राबवित आहोत. कृपया आपण आमच्या भावना समजून घ्याल, ही अपेक्षा !

आपण दि.६ डिसेंबर रोजी अथवा ७ डिसेंबरला सकाळी ९.०० वा. पर्यंत कोपरगावी पोहचावे. महाविद्यालय गावाजवळच आहे. शिर्डी कडून आपण येणार असल्यास बेट नाका येथे उतरावे अन्यथा बस स्थानकावरुन चालत अथवा रिक्षाने येता येते. हे पत्र मिळताच आपण केव्हा येणार हे दूरध्वनीवरुन कळवावे, ही विनंती !

वितरणाची पत्रिका लवकरच पाठविता. वेळ कमी आहे. बाकी दूरध्वनीवर बोलतो.

**आपल्या साहित्यातून यापुढेही ग्रामीण माणसाचे सुख-दुःख अधिक सशक्तपणे यावे व त्याला अनेक सन्मान लाभावे, यासाठी उदंड शुभेच्छा !**

कळावे,

आपला स्नेहांकित,

मराठी विभाग

(डॉ. गणेश देशमुख)
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना
फोन नं. : निवास : (०२४२३) २९५९५५,
कार्यालय : २२२२५४, भ्रमणध्वनी : ९४२०६३९९५५

रजि.नं.३/१७१/अहमदनगर

संस्थापक



माजी आमदार के.बी. रोहमारे

# भि.ग. रोहमारे ट्रस्ट

पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. ☎ (०२४२३) २७५२२२

• संस्थापक : माजी आमदार कै. के.बी. रोहमारे • अध्यक्ष : अशोकराव रोहमारे

पत्रव्यवहाराचा पत्ता : भि.ग. रोहमारे ट्रस्ट, द्वारा प्राचार्य, के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर. फोन - (०२४२३) २२२२५४

जावक क्र. : ३९ दि. १४/११/२०१९

प्रति,
**मा. प्रा. जयराम खेडेकर**
जालना.

स.न.वि.वि.

**सर्व प्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन !**

इ.स.२०२० चा राज्यपातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार आपल्या **मोरपीस** या कविता संग्रहास जाहीर करतांना आम्हाला आनंद होत आहे. पुरस्काराचे स्वरुप रोख रु.११,०००/-, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. पुरस्काराचे वितरण मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ रोजी स.१०.०० वा. के. जे. सोमैया महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव येथे ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. आपणास विनंती की आमच्या हा छोटासा सन्मान स्वीकारण्यासाठी यावे.

आपली व सोबत एका व्यक्तिची निवास-भोजन व्यवस्था करण्यात आली असून आर्थिक मर्यादेमुळे तीव्र इच्छा असूनही आपणास नाममात्र प्रवासभाडे मात्र देण्यात येईल. सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून हा उपक्रम आम्ही राबवित आहोत. कृपया आपण आमच्या भावना समजून घ्याल, ही अपेक्षा !

आपण दि.६ डिसेंबर रोजी अथवा ७ डिसेंबरला सकाळी ९.०० वा. पर्यंत कोपरगावी पोहचावे. महाविद्यालय गावाजवळच आहे. शिर्डी कडून आपण येणार असल्यास बेट नाका येथे उतरावे अन्यथा बस स्थानकावरुन चालत अथवा रिक्षाने येता येते. हे पत्र मिळताच आपण केव्हा येणार हे दूरध्वनीवरुन कळवावे, ही विनंती !

वितरणाची पत्रिका लवकरच पाठविता. वेळ कमी आहे. बाकी दूरध्वनीवर बोलतो.

**आपल्या साहित्यातून यापुढेही ग्रामीण माणसाचे सुख-दु:ख अधिक सशक्तपणे यावे व त्याला अनेक सन्मान लाभावे, यासाठी उदंड शुभेच्छा !**

कळावे,

आपला स्नेहांकित,

के.जे. सोमैया महाविद्यालय मराठी विभाग कोपरगांव, जि.अहमदनगर

**(डॉ. गणेश देशमुख)**
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना
फोन नं. : निवास : (०२४२३) २९५९५५,
कार्यालय : २२२२५४, भ्रमणध्वनी : ९४२०६३९९५५

रजि.नं.३/१७१/अहमदनगर

संस्थापक



माजी आमदार के.बी. रोहमारे

# भि.ग. रोहमारे ट्रस्ट

पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. ☎ (०२४२३) २७५२२२

• संस्थापक : माजी आमदार कै. के.बी. रोहमारे • अध्यक्ष : अशोकराव रोहमारे

पत्रव्यवहाराचा पत्ता : भि.ग. रोहमारे ट्रस्ट, द्वारा प्राचार्य, के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर. फोन - (०२४२३) २२२२५४

जावक क्र. :

दि. १४/११/२०२१

प्रति,

**मा. प्रा. केदार काळवणे**

कळंब, जि. उस्मानाबाद

स.न.वि.वि.

**सर्व प्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन !**

इ.स.२०२० चा राज्यपातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार आपल्या **ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि समीक्षा** या समीक्षा ग्रंथास (विभागून) जाहीर करतांना आम्हाला आनंद होत आहे. पुरस्काराचे स्वरुप रोख रु.११,०००/- (विभागून- ५,५००/-), स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. पुरस्काराचे वितरण मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ रोजी स.१०.०० वा. के. जे. सोमैया महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव येथे ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. आपणास विनंती की आमच्या हा छोटासा सन्मान स्वीकारण्यासाठी यावे.

आपली व सोबत एका व्यक्तिची निवास-भोजन व्यवस्था करण्यात आली असून आर्थिक मर्यादेमुळे तीव्र इच्छा असूनही आपणास नाममात्र प्रवासभाडे मात्र देण्यात येईल. सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून हा उपक्रम आम्ही राबवित आहोत. कृपया आपण आमच्या भावना समजून घ्याल, ही अपेक्षा !

आपण दि.६ डिसेंबर रोजी अथवा ७ डिसेंबरला सकाळी ९.०० वा. पर्यंत कोपरगावी पोहचावे. महाविद्यालय गावाजवळच आहे. शिर्डी कडून आपण येणार असल्यास बेट नाका येथे उतरावे अन्यथा बस स्थानकावरुन चालत अथवा रिक्षाने येता येते. हे पत्र मिळताच आपण केव्हा येणार हे दूरध्वनीवरुन कळवावे, ही विनंती !

वितरणाची पत्रिका लवकरच पाठविता. वेळ कमी आहे. बाकी दूरध्वनीवर बोलतो.

**आपल्या साहित्यातून यापुढेही ग्रामीण माणसाचे सुख-दु:ख अधिक सशक्तपणे यावे व त्याला अनेक सन्मान लाभावे, यासाठी उदंड शुभेच्छा !**

कळावे,

आपला स्नेहांकित,

(डॉ. गणेश देशमुख)
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना
फोन नं. : निवास : (०२४२३) २९५९५५,
कार्यालय : २२२२५४, भ्रमणध्वनी : ९४२०६३९९५५

रजि.नं.३/१७१/अहमदनगर

संस्थापक



माजी आमदार के.बी. रोहमारे

# भि.ग. रोहमारे ट्रस्ट

पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. ☎ (०२४२३) २७५२२२

• संस्थापक : माजी आमदार कै. के.बी. रोहमारे • अध्यक्ष : अशोकराव रोहमारे

पत्रव्यवहाराचा पत्ता : भि.ग. रोहमारे ट्रस्ट, द्वारा प्राचार्य, के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगांव
ता. कोपरगांव - ४२३६०१, जि. अ.नगर. फोन - (०२४२३) २२२२५४

जावक क्र. :

दि. १५/११/२०२१

प्रति,

**मा. प्रा. डॉ. अनंता सूर**
गणेशपूर, ता. वणी.

स.न.वि.वि.

**सर्व प्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन !**

इ.स.२०२० चा राज्यपातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार आपल्या **काटेरी पायवाट** या आत्मकथनास (विभागून) जाहीर करतांना आम्हाला आनंद होत आहे. पुरस्काराचे स्वरुप रोख रु.११,०००/- (विभागून-५,५००/-), स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. पुरस्काराचे वितरण मंगळवार, ७ डिसेंबर २०२१ रोजी स.१०.०० वा. के. जे. सोमैया महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव येथे ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक मा.प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभहस्ते व कोपरगावचे माजी नगराध्यक्ष मा. पद्मकांतजी कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. आपणास विनंती की आमच्या हा छोटासा सन्मान स्वीकारण्यासाठी यावे.

आपली व सोबत एका व्यक्तिची निवास-भोजन व्यवस्था करण्यात आली असून आर्थिक मर्यादेमुळे तीव्र इच्छा असूनही आपणास नाममात्र प्रवासभाडे मात्र देण्यात येईल. सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून हा उपक्रम आम्ही राबवित आहोत. कृपया आपण आमच्या भावना समजून घ्याल, ही अपेक्षा !

आपण दि.६ डिसेंबर रोजी अथवा ७ डिसेंबरला सकाळी ९.०० वा. पर्यंत कोपरगावी पोहचावे. महाविद्यालय गावाजवळच आहे. शिर्डी कडून आपण येणार असल्यास बेट नाका येथे उतरावे अन्यथा बस स्थानकावरुन चालत अथवा रिक्षाने येता येते. हे पत्र मिळताच आपण केव्हा येणार हे दूरध्वनीवरुन कळवावे, ही विनंती !

वितरणाची पत्रिका लवकरच पाठविता. वेळ कमी आहे. बाकी दूरध्वनीवर बोलतो.

**आपल्या साहित्यातून यापुढेही ग्रामीण माणसाचे सुख-दु:ख अधिक सशक्तपणे यावे व त्याला अनेक सन्मान लाभावे, यासाठी उदंड शुभेच्छा !**

कळावे,

आपला स्नेहांकित,

के.जे. सोमैया महाविद्यालय मराठी विभाग कोपरगांव, जि.अहमदनगर

**(डॉ. गणेश देशमुख)**
कार्यवाह
भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना
फोन नं. : निवास : (०२४२३) २९५९५५,
कार्यालय : २२२२५४, भ्रमणध्वनी : ९४२०६३९९५५

सकाळ »
अहमदनगर, बुधवार, १ डिसेंबर २०२१
३

# रोहमारे पुरस्कारांची घोषणा

## जगताप, जाधव, प्रा. खेडेकर, सूर, काळवणे पुरस्काराचे मानकरी

कोपरगाव, ता. ३० : तालुक्यातील पोहेगाव येथील भि. ग. रोहमारे ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. संतोष जगताप, माधव जाधव, प्रा. जयराम खेडेकर, केदार काळवणे, अनंता सूर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अशोक रोहमारे व कार्यवाह डॉ. गणेश देशमुख, सहकार्यवाह डॉ. संजय दवंगे यांनी दिली.

संतोष जगताप यांच्या 'विजेने चोरलेले दिवस' या कांदबरीस, माधव जाधव यांच्या 'चिन्हांकित यादीतली माणसं' या कथासंग्रहास, प्रा. जयराम खेडेकर यांच्या 'मोरपीस' या कवितासंग्रहास, केदार काळवणे यांच्या 'ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि समीक्षा' या समीक्षा ग्रंथास, तर अनंता सूर यांच्या 'कांटेरी पायवाट' या आत्मकथनास पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख ११ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कारांचे वितरण कोपरगावं तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष (कै.) के. बी. रोहमारे यांच्या स्मृतिदिनी (सात डिसेंबर) सकाळी दहा वाजता के. जे. सोमय्या महाविद्यालयात होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद देशमुख यांच्या हस्ते व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होईल. सचिव ॲड. संजीव कुलकर्णी, प्राचार्य डॉ. बी. एस. यादव, विश्वस्त रमेश रोहमारे, शोभा रोहमारे, संदीप रोहमारे, ॲड. राहुल रोहमारे उपस्थित होते.

### उल्लेखनीय ग्रंथ

'उन्हानं बांधलं सावलीचं घर' (भाग्यश्री केसकर), 'फरफट' (छाया बेले), 'मातीमळण' (विजयकुमार मिठे), 'सृजनगंध' (डॉ. चंद्रकांत पोतदार), ऋतू बरवा' (विश्वास बसेंकर) या ग्रंथांचा उल्लेखनीय ग्रंथ म्हणून निवड समितीने सन्मान केला आहे.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
बुधवार, १ डिसेंबर २०२१

# भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार जाहीर

## संदीप जगताप, माधव जाधव, जयराम खेडेकर, केदार काळवणे, अनंता सूर यांचा समावेश



संदीप जगताप माधव जाधव जयराम खेडेकर केदार काळवणे अनंता सूर

**कोपरगाव** (प्रतिनिधी– भि.ग. रोहमारे ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या राज्य पातळीवरील ग्रामीण साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून पुरस्कार प्राप्त लेखकांमध्ये संदीप जगताप (सांगोला, जि. सोलापूर), माधव जाधव (नांदेड), जयराम खेडेकर (जालना), केदार काळवणे (कळंब, उस्मानाबाद), अनंता सूर (वणी, जि. यवतमाळ), यांचा समावेश असल्याची माहिती रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे व पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. गणेश देशमुख व सहकार्यवाह डॉ. संजय दवंगे यांनी दिली.

या प्रसंगी ट्रस्टी रमेश रोहमारे, शोभाताई रोहमारे, संदीप रोहमारे, ॲड. राहुल रोहमारे व प्राचार्य डॉ. एस. यादव उपस्थित होते. भि.ग. रोहमारे ट्रस्टतर्फे १९८९ पासून महाराष्ट्र पातळीवर ग्रामीण साहित्यातील कवितासंग्रह, कांदबरी, कथासंग्रह व समीक्षा या साहित्यप्रकारातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांना दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी २०२० या वर्षातील या ग्रंथांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. त्यात विजेने चोरलेले दिवस संतोष जगताप, चिन्हांकित यादीतली: माणसं माधव जाधव, मोरपीस: प्रा. जयराम खेडेकर, ग्रामीण साहित्य: संकल्पना आणि समीक्षा: केदार काळवणे, काटेरी पायवाट: अनंता सूर, प्रत्येक साहित्य प्रकारातील ग्रंथांना प्रत्येकी ११ हजार रुपये व स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वर्षी समीक्षा या साहित्य प्रकारात समाधानकारक ग्रंथ न आल्याने या प्रकाराचा पुरस्कार ग्रामीण साहित्य: संकल्पना समीक्षा व काटेरी पायव.. या ग्रंथांना विभागून देण्यात आला आहे. ट्रस्टकडे आलेल्या एकूण ५२ साहित्यकृर्तीपैकी उपरोक्त ग्रंथांची निवड करण्याचे कार्य डॉ. भीमराव वाकचौरे, डॉ. भास्कर शेळके, डॉ. गणेश देशमुख, डॉ. जिभाऊ मोरे, डॉ. संजय दवंगे यांच्या संयुक्त निवड समितीने केले. वरील ग्रंथाशिवाय निवड समितीने उन्हानं बांधलं सावलीचं घर (भाग्यश्री केसकर), फरफट (छाया बेले). मातीमळण (विजयकुमार मिठे), सृजनगंध (डॉ. चंद्रकांत पोतदार), ऋतु बरवा (विश्वास बसेंकर) या ग्रंथांचा उल्लेखनीय ग्रंथ म्हणून निवड समितीने विशेष [illegible] केला आहे. भि.ग. रोहमारे ट्रस्टतर्फे सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून १९८९ पासून हा उपक्रम राबविण्यात येतो. ग्रामीण नवलेखकांच्या निर्मितीक्षम मनांना प्रोत्साहन देणे, हा यामागील मूळ उद्देश असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे यांनी केले. पुरस्कारांचे वितरण कै.के.बी. रोहमारे यांच्या तेवीसाव्या स्मृतिदिनी ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. सदानंद देशमुख यांच्याहस्ते व माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजता के. जे. सोमैया महाविद्यालय कोपरगाव येथे केले जाणार आहे.

लोकमत
गुरुवार, दि. २ डिसेंबर २०२१

# जगताप, जाधव, खेडेकर, काळवणे, सूर यांना भि. ग. रोहमारे पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोपरगाव : तालुक्यातील पोहेगाव येथील भि. ग. रोहमारे ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या राज्य पातळीवरील ग्रामीण साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पुरस्कार प्राप्त लेखकांमध्ये संतोष जगताप (सांगोला, जि. सोलापूर), माधव जाधव ( नांदेड), जयराम खेडेकर (जालना), केदार काळवणे (कळंब, जि. उस्मानाबाद), अनंता सूर (वणी, जि. यवतमाळ) या लेखकांचा समावेश आहे.

पुरस्काराची माहिती रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अंशोक रोहमारे व पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. गणेश देशमुख, सहकार्यवाह डॉ. संजय दवंगे यांनी येथे दिली. या प्रसंगी ट्रस्टी रमेश रोहमारे, शोभा रोहमारे, संदीप रोहमारे, राहुल रोहमारे व प्राचार्य डॉ. बी. एस. यादव उपस्थित होते. या वर्षीच्या पुरस्कारांचे वितरण कोपरगावचे माजी आमदार व कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष स्व. के. बी. रोहमारे यांच्या तेवीसाव्या स्मृतिदिनी ज्येष्ठ मराठी व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व चित्रपट पटकथाकार डॉ. सदानंद देशमुख यांच्या हस्ते व कोपरगाव नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार ( दि. ७ डिसेंबर) सकाळी १० वाजता कोपरगाव येथील के. जे. सोमैया महाविद्यालयात केले जाणार आहे. यावर्षी २०२० या वर्षातील पुढील ग्रंथांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये विजेने चोरलेले दिवस : संतोष जगताप ( ग्रामीण कांदबरी दर्या प्रकाशन, पुणे), चिन्हांकित यादीतली माणसं : माधव जाधव (ग्रामीण कथासंग्रह-सायन पब्लिकेशन, पुणे), मोरपीस : प्रा. जयराम खेडेकर (ग्रामीण कविता संग्रह-उमी प्रकाशन, जालना ), ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि समीक्षा : केदार काळवणे (ग्रामीण साहित्य समीक्षा अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे), काटेरी पायवाट : अनंता सूर ( ग्रामीण आत्मकथन अथर्व. पब्लिकेशन, धुळे) यांचा समावेश आहे. या पुरस्कारात साहित्य प्रकारातील ग्रंथांना प्रत्येकी रोख ११ हजार, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच या वर्षी समीक्षा या साहित्य प्रकारात समाधानकारक ग्रंथ न आल्याने या प्रकाराचा पुरस्कार ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि समीक्षा व काटेरी पायवाट या ग्रंथांना विभागून देण्यात आला आहे.




माधव जाधव, जयराम खेडकर,




संतोष जगताप, केदार काळवणे

सकाळ
अहमदनगर, बुधवार,
८ डिसेंबर २०२१

# ज्ञानोबा-तुकोबांची लेखनपरंपरा चालवावी

## डॉ. सदानंद देशमुख; कोपरगावमध्ये भि. ग. रोहमारे पुरस्कारांचे उत्साहात वितरण

**कोपरगाव, ता. ७ :** संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या साहित्याने मराठी साहित्याला वेगळी दिशा दिली. साहित्य का, कधी, कसे लिहायचे, त्याचा हेतू काय असावा, यातून समाजजागृतीचे कार्य केले. त्यांचा आदर्श व तीच परंपरा पुढे चालवत ग्रामीण साहित्यिकांनी लेखन करावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक, चित्रपट पटकथाकार डॉ. सदानंद देशमुख यांनी केले.

पोहेगाव (ता. कोपरगाव) येथील भि. ग. रोहमारे ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी संतोष जगताप, माधव जाधव, प्रा. जयराम खेडेकर, केदार काळवणे, अनंता सूर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अकरा हजार रुपये, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. व्यासपीठावर कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक रोहमारे, सचिव ॲड. संजीव कुलकर्णी, विश्वस्त चंद्रशेखर कुलकर्णी, रमेश रोहमारे, पोलिस निरीक्षक वासुदेव देसले, ज्ञानेश्वरानंद महाराज, प्राचार्य डॉ. वी. एस. यादव उपस्थित होते. स्वागत प्राचार्य डॉ. बी. एस. यादव यांनी केले.



कोपरगाव : भि. ग. रोहमारे राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य पुरस्कार विजेत्यांसह ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद देशमुख, अशोक रोहमारे, माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे आदी. (छायाचित्र : दीपक शिंदे)

> पुढील वर्षापासून शेती, कला, साहित्य, उद्योजक या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना माजी आमदार (कै.) के. बी. रोहमारे जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार आहेत. पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, असे असणार आहे.
> - अशोक रोहमारे, अध्यक्ष, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी

डॉ. देशमुख म्हणाले, की भि. ग. रोहमारे पुरस्कारांची एक वेगळी उंची आहे. लेखनऊर्जा उन्नत करण्यासाठी असे पुरस्कार महत्त्वाचे आहेत. पुरस्कारप्राप्त लेखकांनी आपले लेखन आणखी उन्नत केले पाहिजे. अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे म्हणाले, की (कै.) के. वी. रोहमारे यांचे तालुक्याच्या विकासातील कार्य मोठे आहे. आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी मोठे केले. असा मोठेपणा इतर नेत्यांमध्ये दिसत नाही.

प्रा. खेडेकर यांनी कविता सादर केल्या. संदीप रोहमारे, ॲड. राहुल रोहमारे, सुजित रोहमारे, शोभा रोहमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शैलेंद्र बनसोडे, प्रा. जिभाऊ मोरे यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी
दिव्य मराठी, बुधवार, ८ डिसेंबर २०२१

# पुरस्कार जबाबदारीने लेखन करण्याची प्रेरणा देणारा असतो

## ग्रामीण कादंबरीकार देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | कोपरगाव

कोणताही साहित्य पुरस्कार हा लेखकाला पुढील लेखनाची ऊर्जा देणारा असतो. यापुढे जबाबदारीने लेखन करण्याची प्रेरणा देणारा असतो, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार व चित्रपट पटकथा लेखक डॉ. सदानंद देशमुख यांनी केले.

तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार के. बी. रोहमारे यांच्या २४ व्या पुण्यस्मरण व भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. देशमुख बोलत होते.अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक व माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे होते.



भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण प्रसंगी डॉ. सदानंद देशमुख, पद्माकांत कुदळे, प्राचार्य डॉ. बी. एस. यादव आदी.

डॉ. देशमुख म्हणाले, महाराष्ट्रात मराठी साहित्यात उच्च पातळीवरील समजल्या जाणाऱ्या भि. ग. रोहमारे ग्रामीण सहित्य पुरस्काराचे वितरण माझ्या हस्ते होते आहे. त्याचा आनंद दीर्घकाळ स्मरणात राहणारा आहे. १९९० मध्ये माझ्या अंधारवन कथासंग्रहाला पहिला भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त झाला होता. आज ३१ वर्षांनी पुन्हा कोपरगावात आलो ते केवळ रोहमारे परिवाराचे शेती, शेतकरी व शेतमजूर आणि ग्रामीण साहित्याबद्दल असलेली आस्था आणि तळमळ बघून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच.

महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाशाला आहे. कारण तेथेच युग प्रवर्तक संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची निर्मिती केली. नवनिर्मितीची आस व कृषि संस्कृतीतून प्रेरणा घेऊनच संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या अजरामर ग्रंथाची रचना केली.

कुदळे म्हणाले, के. बी. दादांना व्यक्तिगत आयुष्यात खूप मोठे होता आले असते कारण त्यांच्या भोवती यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब भारदे, शंकरराव चव्हाण यासारखी हिमालयाएवढी उंचीची माणसे होती. परंतू शेवटपर्यंत केवळ शेतकरी, शेतमजूर य कष्टकरी वर्गाशी नाळ जोडलेली असल्याने ते त्यांच्या उन्नतीसाठीच जगले. या प्रसंगी भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त करणारे कादंबरीकार संतोष जगताप (सांगोला, जि. सोलापूर), माधव जाधव (नांदेड), जयराम खेडेकर (जालना), केदार काळवणे (कळंब, जि. उस्मानाबाद), अनंता सूर (वणी, जि. यवतमाळ) यांना डॉ. सदानंद देशमुख यांच्या शुभ हस्ते वर्ष २०२० चे भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी, एस. यादव यांनी केले. तर परिचय प्रा. डॉ. जिभाऊ मोरे यांनी करून दिला.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
अहमदनगर । गुरुवार
९.१२.२०२१

सदानंद देशमुख : भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्काराचे वितरण

# ग्रामीण भागातील कष्टकरी वर्गाचे जीवन क्लेशदायक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोपरगाव : ग्रामीण जीवनातील दारिद्र्य आणि कष्ट पाचवीलाच पुजलेले असल्याने ग्रामीण साहित्यनिर्मितीचे संस्कार घरातूनच झाले आणि बारावीत असताना पहिली कथा घरातील मरणाच्या दाराशी असलेल्या म्हाताऱ्या बैलावर लिहिली. आजही ग्रामीण भागातील कष्टकरीवर्गाचे जीवन तसेच आहे. ही अतिशय क्लेशदायक बाब आहे, असे साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार व चित्रपट पटकथा लेखक डॉ. सदानंद देशमुख यांनी म्हटले आहे.



कोपरगाव येथे भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार के.बी. रोहमारे यांच्या चोविसाव्या पुण्यस्मरण व भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक व माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी.एस. यादव यांनी केले. तर, प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.डॉ. जिभाऊ मोरे यांनी करून दिला.

याप्रसंगी भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त करणारे कादंबरीकार संतोष जगताप (सांगोला, जि. सोलापूर), माधव जाधव (नांदेड), जयराम खेडेकर (जालना), केदार काळवणे (कळंब, जि. उस्मानाबाद), अनंता सूर (वणी, जि. यवतमाळ) यांना डॉ. सदानंद देशमुख यांच्या हस्ते वर्ष २०२० चे भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास भि. ग. रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष रमेश रोहमारे, एज्युकेशन सोसायटीचे सदस्य चंद्रशेखर कुलकर्णी, जवाहर शहा, ॲड. संजय भोकरे, सुनील शिंदे, संदीप रोहमारे, सुनील बोरा, परीक्षक डॉ. भीमराव वाकचौरे, मनोज जोशी, शंकर दुपारगुडे, नानासाहेब जावळे, कोपरगाव परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, साहित्य रसिक, सेवकवृंद व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शैलेंद्र बनसोडे यांनी केले. तर, महाविद्यालय विकास समितीचे संचालक ॲड. राहुल रोहमारे यांनी आभार मानले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
गुरुवार, ९ डिसेंबर २०२१

# संस्कृतीआड येणाऱ्या खलप्रवृत्तीचा नाश करण्याचा संदेश संत ज्ञानेश्वरांनी दि

**सोनेवाडी (वार्ताहर)**– महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाशाला आहे. कारण तेथेच युगकर्ते संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी या कालजयी ग्रंथाची निर्मिती केली. नवनिर्मितीची आस व कृषि संस्कृतीतून प्रेरणा घेऊनच संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या अजरामर ग्रंथाची रचना केली. यातून कृषि व कष्टकरी संस्कृतीच्या आड येणाऱ्या खलप्रवृत्तीचा नाश करण्याचा संदेश दिला गेला असल्याचे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार व चित्रपट पटकथा लेखक डॉ. सदानंद देशमुख यांनी येथे केले.

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष के. बी. रोहमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी देण्यात येत असलेल्या भि. ग. रोहमारे ग्रामीण सहित्य पुरस्काराचे वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रसंत ज्ञानदेशानंद शास्त्री, पद्मकांत कुदळे, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे, रमेशराव रोहमारे, सचिव संजीव कुलकर्णी, पोलीस निरीक्षक देसले, चंद्रशेखर कुलकर्णी, जवाहर शहा, प्राचार्य बी. एस. यादव, शोभाताई रोहमारे, मंदाताई रोहमारे, राहुल रोहमारे, संदीप रोहमारे, अमित रोहमारे, काळे कारखान्याचे संचालक सुनील शिंदे, परीक्षक भिमराज



वाकचौरे, गणेश देशमुख, श्रेया रोहमारे, वनिता देशमुख आदी उपस्थित होते.

२०२० चे भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त करणारे कादंबरीकार संतोष जगताप (सांगोला, जि. सोलापूर), माधव जाधव (नांदेड), जयराम खेडेकर (जालना), केदार काळवणे (कळंब, जि. उस्मानाबाद), अनंता सूर (वणी, जि. यवतमाळ) यांना

PART- C

नाशिक-अहमदनगर | गुरुवार, ९ डिसेंबर २०२१

पुण्य नगरी PAGE ३

# रोहमारे परिवाराची ग्रामीण साहित्याबद्दलची आस्था निस्वार्थ- डॉ. देशमुख

**कोपरगाव :** कोणताही साहित्य पुरस्कार हा लेखकाला ऊर्जा व लेखनाची प्रेरणा देणारा असतो. १९९० साली माझ्या अंधारवन कथासंग्रहाला पहिला भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त झाला होता.आज ३१ वर्षांनी पुन्हा कोपरगावात आलो ते केवळ रोहमारे परिवाराचे शेती, शेतकरी,शेतमजूर आणि ग्रामीण साहित्याबद्दल असलेली आस्था आणि तळमळ बघून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच,असे गौरवोउद्गार लेखक डॉ. सदानंद देशमुख यांनी काढले.

ते माजी आमदार के. बी. रोहमारे यांच्या २४ व्या पुण्यस्मरण दिनी भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण प्रसंगी बोलत होते.अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे होते.डॉ. देशमुख पुढे म्हणाले,महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाशाला आहे.कारण तेथेच युगकर्त संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी या कालजयी ग्रंथाची निर्मिती केली.नवनिर्मितीची आस व कृषि संस्कृतीतून प्रेरणा घेऊनच संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या अजरामर ग्रंथाची रचना केली. यातून कृषी व कष्टकरी संस्कृतीच्या आड येणाऱ्या खलप्रवृत्तीचा नाश करण्याचा संदेश दिला गेला,असल्याचे सांगितले. कुदळे म्हणाले की, के. बी. दादांना व्यक्तीगत आयुष्यात खूप मोठे होता आले असते, कारण त्यांच्या भोवती यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब भारदे, शंकरराव चव्हाण यासारखी हिमालयाएवढी उंचीची माणसे होती. नगर जिल्हा आणि कोपरगाव तालुक्यातील अनेक शेती केंद्रीत संस्थांच्या उभारणीत के. बी.चा सिंहाचा वाटा आहे. तरी देखील त्यांनी त्याचे कधीही भांडवल केले नाही.अशोक रोहमारे यांनी भि. ग. रोहमारे साहित्य पुरस्काराचा इतिहास विशद केला. संस्थेचे सचिव ॲड. संजीव कुलकर्णी यांनी भि. ग. रोहमारे पुरस्कार योजनेसाठी



गेली ३२ वर्षे योगदान करणाऱ्या रोहमारे परिवाराचे कौतुक केले.

कादंबरीकार संतोष जगताप, माधव जाधव, जयराम खेडेकर, केदार काळवणे, अनंता सूर,डॉ. सदानंद देशमुख यांच्या हस्ते भि. ग. रोहमारे पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सर्व पुरस्कार विजेत्यांनी सत्काराला उत्तर देतांना आपापल्या लेखनामागील प्रेरणा व भूमिका कथन करतांना नमुना दाखल मार्मिक कविता सादर केल्या.प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी. एस. यादव यांनी केले. तर परिचय प्रा. डॉ. जिभाऊ मोरे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. शैलेंद्र बनसोडे यांनी केले. शेवटी आभार ॲड. राहुल रोहमारे यांनी आभार मानले.यावेळी रमेशराव रोहमारे,चंद्रशेखर कुलकर्णी, जवाहर शहा,ॲड. संजय भोकरे, सुनिल शिंदे, संदिप रोहमारे, सुनिल बोरा, परीक्षक डॉ. भिमराव वाकचौरे, रोहमारे कुटुंबीय, प्रतिष्ठीत नागरिक, साहित्य रसिक, सेवकवृंद व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

# मा.आ.कैं. के.बी. रोहमारे पुण्यस्मरण व भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण - दि. ७ डिसेंबर २०२१



पुण्यस्मरण दिनी सकाळी कैं.के.बी. साहेबांच्या समाधीला पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करताना संस्थाध्यक्ष मा. अशोकराव रोहमारे सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी वृंद



कैं.के.बी. रोहमारे पुण्यस्मरण व भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण प्रसंगी प्रास्ताविक करताना, पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. गणेश देशमुख परीक्षकांच्या वतीने मनोगत व्यक्त करतांना, समवेत इतर मान्यवर



या प्रसंगी भि.ग. रोहमारे ट्रस्ट व को.ता.एज्यु. सोसायटीचे अध्यक्ष मा. अशोकराव रोहमारे पुरस्कार योजनेविषयी भूमिका स्पष्ट करताना, समवेत इतर मान्यवर



के.बी. रोहमारे पुण्यस्मरण प्रसंगी को.ता.एज्यु. सोसायटीची भूमिका स्पष्ट करताना संस्थेचे सचिव मा.ॲड्. संजीव कुलकर्णी, समवेत इतर मान्यवर



के.बी. रोहमारे पुण्यस्मरण व पुरस्कार वितरण प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य डॉ. बी. एस. यादव, समवेत इतर मान्यवर



भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कारांचे परीक्षक, माजी प्राचार्य डॉ. भीमराव वाकचौरे यांचा सन्मान करताना मा. रमेशराव रोहमारे, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर